मनोरंजनासह प्रबोधनासाठी...

दैनिक

epaper.rayatsamachar.com

# रयत समाचार

खिंचों न कमानों को, न तलवार निकालो, जब तोप मुकाबिल हो, तो अख़बार निकालो - अकबर इलाहाबादी

संपादक : भैरवनाथ वाकळे | महाराष्ट्र, गोवा, कर्नाटक राज्यात एकाचवेळी प्रसिध्द होणारे दैनिक

● RNI No. MAHMAR/2011/40847 ● वर्ष १३ वे ● अंक ३२५ वा ● सोमवार, ता. ९ जून २०२५ ● www.rayatsamachar.com ● पाने ४ ● मूल्य रु. ४.००

शुभारंभ

दैनिक नमो संघराज

सर्व सामान्यांचे हक्काचे व्यासपीठ

संपादक बाबा जाधव

www.namosanghraj.com Gmail id : namosanghraj@gmail.com

कार्यालय : पारगल्ली,माळीवाडा,अहिल्यानगर, मो. ९४२२२२२५४६, ७०२०५८१२०२




## ‘मेक इन महाराष्ट्र’च्या दिशेने महत्त्वाचे पाऊल

### ‘जॉन डिअर’च्या स्मार्ट कृषी प्रकल्पाचे मुख्यमंत्री फडणवीसांच्या हस्ते उद्घाटन

**शिरूर । प्रतिनिधी**

‘मेक इन महाराष्ट्र’ उपक्रमाला चालना देणारे एक महत्त्वाचे पाऊल उचलत, जॉन डिअर इंडियाच्या पुण्यातील शिरूर औद्योगिक वसाहतीतील सणसवाडी येथील प्रकल्पाचे उद्घाटन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते झाले. या प्रसंगी जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी, पीएमआरडीएचे आयुक्त दीपक सिंगला, पोलीस अधीक्षक संदीप गिल, तसेच जॉन डिअरचे वरिष्ठ अधिकारी राजेश सिन्हा, मुकुल वासने, देवेंद्र बहीरट आदी उपस्थित होते. मुख्यमंत्री फडणवीस यांनी आपल्या भाषणात कृषी क्षेत्रात होत असलेल्या तंत्रज्ञानविषयक बदलांचे स्वागत केले. ‘‘जॉन डिअर सारख्या आघाडीच्या कंपनीकडून उन्नत तंत्रज्ञानावर आधारित स्मार्ट कृषी यंत्रसामग्री महाराष्ट्रात निर्माण करून ती जगभर निर्यात केली जावी, अशी आमची अपेक्षा आहे,’’ असे त्यांनी नमूद केले. फडणवीस म्हणाले, ‘‘कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर आता शेतीतही होऊ लागला आहे. या माध्यमातून कृषी प्रक्रियेत क्रांतिकारी बदल घडून येत असून, उत्पादनात गुणात्मक वाढ होते आहे. हे परिवर्तन शेतकऱ्यांना अधिक सक्षम, समृद्ध आणि आत्मनिर्भर करण्याच्या दृष्टीने महत्त्वाचे आहे.’’ शेतकऱ्यांना अधिक सुलभ, कार्यक्षम आणि तांत्रिकदृष्ट्या प्रगत साधनसामग्री देण्यासाठी जॉन डिअरचा हा प्रकल्प मैलाचा दगड ठरणार आहे, असेही ते म्हणाले. या उद्घाटनप्रसंगी उपस्थित अधिकारी आणि मान्यवरांनी देखील प्रकल्पाच्या माध्यमातून निर्माण होणाऱ्या रोजगार संधी आणि स्थानिक अर्थव्यवस्थेला मिळणाऱ्या चालनेचा उल्लेख केला. जॉन डिअरचा सणसवाडी प्रकल्प केवळ एक औद्योगिक पायाभूत सुविधा नसून, तो ‘स्मार्ट शेती’च्या दिशेने महाराष्ट्राचा आत्मविश्वास दाखवणारा एक प्रेरणादायी प्रयोग ठरणार आहे.

## आयोगाची पारदर्शकता आणि उत्तरदायित्वावर भर

### भारत निवडणूक आयोगाचे स्पष्टीकरण




**मुंबई । प्रतिनिधी**

भारत निवडणूक आयोगाने स्पष्ट केले आहे की, ‘‘आमची प्रक्रिया पारदर्शक, ठोस आणि उत्तरदायित्वपूर्ण आहे.’’ काँग्रेस पक्षाकडून आलेल्या निवेदनाला उत्तर देताना आयोगाने २४ डिसेंबर २०२४ रोजी काँग्रेस पक्षाला अधिकृत पत्र पाठवले होते. या पत्रात सर्व मुद्द्यांवर सविस्तर स्पष्टीकरण देण्यात आले होते, असे आयोगाने सांगितले आहे. तरीदेखील काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी माध्यमांद्वारे पुन्हा शंका उपस्थित करत आरोप केल्याने आयोगाने खेद व्यक्त केला आहे.

निवडणूक आयोगाने म्हटले आहे की, ‘‘आम्ही एक स्वतंत्र आणि संविधानिक संस्था आहोत. कोणत्याही राजकीय पक्षाने किंवा नेत्याने थेट पत्र व्यवहाराद्वारे संपर्क साधल्यास आम्ही वेळेवर आणि ठाम उत्तर देतो.’’ राहुल गांधी यांनी वारंवार माध्यमांतून प्रश्न उपस्थित करत संवाद साधण्याऐवजी थेट आयोगाशी संपर्क साधावा, अशी अपेक्षा आयोगाने व्यक्त केली आहे. आयोगाच्या मते, ‘‘माध्यमांमधून आरोप करण्यापेक्षा थेट संस्थेशी संवाद साधल्यास लोकशाही प्रक्रियेचे मूल्य वृद्धिंगत होते आणि नागरिकांचा विश्वास अधिक दृढ होतो.’’ भारत निवडणूक आयोगाने शेवटी असेही स्पष्ट केले की, ‘‘अधिकृतरीत्या आलेल्या प्रश्नांना आम्ही तातडीने उत्तर देतो आणि हीच आमची पारदर्शी प्रक्रिया आहे.’’



## ओबीसींच्या रखडलेल्या मागण्यांची पूर्तता करा

### महासंघाने घेतली भाजप प्रदेशाध्यक्ष नाईक यांची भेट

**पणजी । प्रतिनिधी**

राष्ट्रीय ओबीसी महासंघातर्फे पदव्युत्तर वैद्यकीय अभ्यासक्रमात १०० पॉइंट रोस्टरनुसार ओबीसी, एसटी, एससी विद्यार्थ्यांना प्रवेश मिळावा यांसह ओबीसींच्या अन्य मागण्यांचे निवेदन भारतीय जनता पार्टीचे प्रदेशाध्यक्ष दामू नाईक यांना सादर करण्यात आले.

महासंघाचे अध्यक्ष मधू नाईक यांनी सरकारला सादर केलेल्या ओबीसींच्या या मागण्यांबाबत नाईक यांना माहिती दिली. त्या मान्य होण्याची गरज असल्याबाबत चर्चा केली. याबाबत सहकार्याचे आश्वासन नाईक यांनी दिले. नाईक यांना भेटलेल्या शिष्टमंडळात ओबीसी महासंघाचे सदस्य लक्ष्मीकांत नाईक, बोरी पंचायत समन्वयक सुभाष नाईक व शिरोडा पंचायत समन्वयक शिवाजी नाईक यांचा समावेश होता. ओबीसींच्या या विविध मागण्यांबाबत जलस्रोतमंत्री सुभाष शिरोडकर यांच्याशीही चर्चा केली असल्याचे मधू नाईक यांनी सांगितले. गोवा वैद्यकीय महाविद्यालय व गोवा दंत महाविद्यालयांत १०० पॉइंट रोस्टरनुसार ओबीसी, एसटी, एससी वर्गातील विद्यार्थ्यांना पदव्युत्तर अभ्यासक्रमात प्रवेश मिळावा यासाठी ओबीसी महासंघ सतत प्रयत्न करीत आहे. यासंबंधीची फाईल दोन महिने निर्णयाच्या प्रतीक्षेत आहे असे सांगण्यात आले.

**मंडल यांची जयंती साजरी करा**

**बी. पी. मंडल यांची जयंती राज्य स्तरावर साजरी करावी, अशी विनंती सरकारला केलेली आहे. त्या विषयाचा पाठपुरावा करून यंदापासून जयंती सोहळ्याचे आयोजन करण्याबाबत प्रयत्न करावे, अशी विनंतीही मधू नाईक यांनी दामू नाईक यांना केली.**



## विद्यार्थ्यांचा गौरव, समाजासाठी प्रेरणा

### चौंडेश्वरी संस्था व देवांग कोष्टी मंडळाचा संयुक्त उपक्रम

**अहमदनगर । प्रतिनिधी**

श्री चौंडेश्वरी बहुउद्देशीय सामाजिक संस्था, सावेडी अहमदनगर आणि श्री देवांग कोष्टी पंचमंडळ, नालेगाव यांच्या संयुक्त विद्यमाने दहावी व बारावी उत्तीर्ण विद्यार्थ्यांचा गौरव सोहळा सहकारनगर येथील तीन मंदिर सभागृहात उत्साहात पार पडला. या कार्यक्रमात गुणवंत विद्यार्थ्यांना प्रशस्तीपत्र आणि गौरव चिन्ह देऊन सन्मानित करण्यात आले. विशेषतः ज्योती मनोहर टिपरे (लाटणे) व संध्या बळीराम विधाते (डोईफोडे) या दोन महिलांनी रात्रशाळेतून शिक्षण पूर्ण करत कौटुंबिक जबाबदाऱ्या सांभाळून शैक्षणिक स्वप्न पूर्ण केले, याबद्दल त्यांचे विशेष अभिनंदन करण्यात आले. कार्यक्रमात अक्षय देखणे यांनी विद्यार्थ्यांना पुढील शिक्षणासाठी करिअर मार्गदर्शन दिले. प्रमुख पाहुणे गोवर्धन देखणे यांनी शैक्षणिक कागदपत्रांची महत्त्वाची माहिती देत समाजकार्याची प्रेरणा दिली. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी चौंडेश्वरी संस्थेचे अध्यक्ष पराग खुपसे, उपाध्यक्ष बाबासाहेब पांडकर, सचिव मनेष पंधारे, खजिनदार श्यामसुंदर दुधाने यांच्यासह कार्यकारिणी सदस्य आणि देवांग कोष्टी मंडळाचे अध्यक्ष प्रफुल्ल लाटणे, उपाध्यक्ष अशोक फलके, मुकोटे आणि इतर पदाधिकारी उपस्थित होते. कार्यक्रमाच्या शेवटी अध्यक्ष पराग खुपसे यांनी विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या आणि सर्व उपस्थितांचे आभार मानले. समाजातील अशा उपक्रमांमुळे शिक्षणाविषयीचा जागर वाढत असून विद्यार्थ्यांना पुढील वाटचालीसाठी नवी उमेद मिळत आहे.

## छत्रपती शिवाजी महाराज भारत गौरव पर्यटन रेल्वेला मुख्यमंत्री फडणवीस यांचा हिरवा झेंडा

**मुंबई । गुरूदत्त वाकदेकर**

छत्रपती शिवाजी महाराज यांचा गौरवशाली इतिहास आणि समृद्ध वारशाचा अनुभव देणाऱ्या ‘‘छत्रपती शिवाजी महाराज भारत गौरव पर्यटन रेल्वे’’ला आज ९ जून रोजी सकाळी ६.३० वाजता छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस (CSMT) येथून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हिरवा झेंडा दाखवून रवाना करणार आहेत.




## ...आणि गांधीची प्रशासकाच्या कारभारावर पून्हा हसले ?




**घनकचरा व्यवस्थापनाचे कोट्यावधी रूपयांचे बिले संगनमताने लाटूनही अहिल्यानगर मनपाची झाली कचराकुंडी, शहरात सर्वत्र कचऱ्यांचे ढिग.**

(छायाचित्र - एक्स्प्रेस फोटो, अहमदनगर)

## १००१ घरकुलांना मंजुरी

### अभिषेक खंडागळे यांचा अथक पाठपुरावा

**बेलापूर । शफीक बागवान**

बेलापूर-ऐनतपूर मध्ये तब्बल १००१ घरकुले मंजूर झाली असून ही ऐतिहासिक अशी विक्रमी कामगिरी असल्याची माहिती सरपंच मिना साळवी व उपसरपंच प्रियंका कुऱ्हे यांनी दिली. पालकमंत्री राधाकृष्ण विखे व माजी खासदार सुजय विखे यांच्या सहकार्याने तसेच जिल्हा परिषदेचे माजी सदस्य शरद नवले,बाजार समितीचे माजी उपसभापती अभिषेक खंडागळे यांच्या प्रयत्नातून मोदी आवास योजने अंतर्गत ग्रामपंचायतीच्या इतिहासात पहिल्यांदाच एकाच वेळी या घरकुलांचा प्रस्ताव सादर करण्यात आला होता.

यासंदर्भात पालकमंत्री विखे यांचे सहकार्याने ग्रामविकास मंत्री नामदार जयकुमार गोरे यांचे समवेत बैठकही झाली होती. या प्रयत्नास मोठे यश येवून बेलापूर ग्रामपंचायतीच्या इतिहासात पहिल्यांदाच एकाचवेळी एक हजार एक घरकुलांना मंजुरी मिळाली आहे. हा घरकुल मंजुरीचा आजवरचा विक्रम आहे.सदरची मंजुरी मिळाल्याने एक हजार कुटुंबाच्या हक्काच्या घरांचा प्रश्न मार्गी लागणार आहे.



या मंजूर घरकुलां पैकी ज्या लाभार्थ्यांकडे स्वतःची जागा नाही त्यांच्यासाठी साठी नामदार विखे महसूल मंत्री असताना त्यांनी शेती महामंडळाची ज मि न ग्रामपंचायतीला मोफत दिली आहे. या एक हजार एक घरकुलांच्या प्रस्तावास मंजुरी देवून बेलापूर-ऐनतपूर येथील गरजू नागरिकांच्या घराची स्वप्नपूर्ती केल्याबद्दल राधाकृष्ण विखे, मा. खासदार सुजय विखे यांच्या वर शरद नवले,अभिषेक खंडागळे,सरपंच मिना साळवी, उपसरपंच प्रियंका कुऱ्हे, स्वाती आमोलिक, मुश्ताक शेख, तबसुम बागवान, उज्वला कुताळ, चंद्रकांत नवले, वैभव कुऱ्हे, सुशिलाबाई पवार यांचेसह घरकुल लाभार्थींनी अभिनंदनाचा वर्षाव करत त्यांना मनापासुन धन्यवाद दिले आहेत.

## ९९ वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन साताऱ्यात

**पुणे । श्रीकांत काकतीकर**

अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन शताब्दीच्या दिशेने वाटचाल करत आहे. आगामी ९९ साहित्य संमेलन हे शताब्दी संमेलनाची झलक असणार आहे. त्यामुळे देशाच्या राजधानीत झालेल्या दिल्लीतील संमेलनानंतर पुढील संमेलन कुठे होणार याची सर्वांना उत्सुकता लागून लागलेली राहिली होती. दरम्यान आज पार पडलेल्या अखिल भारतीय साहित्य परिषदेच्या बैठकीत, ९९ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन महाराष्ट्राची ऐतिहासिक राजधानी साताऱ्यात घेण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. तब्बल ३२ वर्षानंतर साताऱ्यात अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन होणार आहे. साहित्य संमेलनाचे स्थळ निश्चित करण्यासाठी स्थळ निवड समिती नेमण्यात आली होती. या समितीने पाच ते सात जून दरम्यान निमंत्रक संस्थांना भेटी दिलेल्या होत्या. संमेलनासाठी सदानंद साहित्य मंडळ औदुंबर, महाराष्ट्र साहित्य परिषद शाखा इचलकरंजी, दक्षिण महाराष्ट्र साहित्य सभा कोल्हापूर आणि महाराष्ट्र साहित्य परिषद शाखा शाहूपुरी सातारा या संस्थांकडून निमंत्रणे आलेली होती.या स्थळांना भेटी दिल्यानंतर नेमण्यात आलेली निवड समिती आजच्या रविवारच्या बैठकीत संमेलन स्थळा बाबत सविस्तर चर्चा करून आगामी ९९ वय अखिल भारतीय साहित्य संमेलन साताऱ्यात घेण्याचा निर्णय घेतला. आजच्या या महत्त्वाच्या बैठकीला,अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाचे अध्यक्ष प्रा. मिलिंद जोशी, उपाध्यक्ष गुरय्या स्वामी, कार्यवाह सुनिताराजे पवार ,कोषाध्यक्ष विनोद कुलकर्णी,विदर्भ साहित्य संघाचे अध्यक्ष प्रदीप दाते, मराठवाडा साहित्य परिषदेचे रामचंद्र काळुंखे, मुंबई मराठी साहित्य संघाच्या प्रतिभा सराफ परिषदेचे सदस्य देविदास फुलारी, दादा गोरे, संजय बच्छाव, पुरुषोत्तम सप्रे, रमेश बनसकर व अन्य सदस्य उपस्थित होते.





**मनपाचे कचरा व्यवस्थापन कोलमडले!**

निंबळक – बोल्हेगाव रोडवरील गांधीनगर कोपऱ्यावर रस्त्याच्या बाजूस २०० मीटर कचऱ्याच्या ढिगाऱ्याची रांग लागलीय. यामुळे परीसरात दुर्गंधी पसरून आरोग्याचे प्रश्न निर्माण होण्याची शक्यता आहे. (छायाचित्र – तुषार सोनवणे)

# पर्यावरण संवर्धनासाठी सर्वांचा पुढाकार महत्त्वाचा– गायकवाड

## शरीफराजे भोसले यांच्या समाधी परिसरात वृक्षारोपण

**नगर तालुका । प्रतिनिधी**

तालुक्यातील भातोडी पारगाव येथे शरीफराजे मालोजीराजे भोसले यांच्या समाधी परिसरात जागतिक पर्यावरण दिनानिमित्त वृक्षारोपण अभियान राबविण्यात आला. उमेद सोशल फाउंडेशन व ईएचएच प्रा.लि. यांच्या वतीने सुरु असलेल्या पर्यावरण संवर्धन सप्ताहातंर्गत हा उपक्रम राबविण्यात आला. उपक्रमाची सुरुवात शरीफराजे भोसले यांच्या समाधीला पुष्पहार अर्पण करून, अभिवादनाने करण्यात आली. गावचे सरपंच विक्रम गायकवाड यांनी उमेद सोशल फाउंडेशन व ईएचएच प्रा.लि. ने घेतलेल्या उपक्रमाचे कौतुक करुन पर्यावरण संवर्धनासाठी सर्वांचा पुढाकार महत्त्वाचा आहे.




सामाजिक कार्याबरोबरच पर्यावरणाच्या प्रश्नासाठी उमेदचे कार्य प्रेरणादायी असल्याचे त्यांनी सांगितले. पत्रकार आदीनाथ शिंदे यांनी उमेद फाऊंडेशनच्या सामाजिक कार्याला युवा वर्ग जोडला जात आहे. सामाजिक निस्वार्थ कार्यासाठी प्रत्येकाचे योगदान महत्त्वाचे ठरणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. या अभियानातंर्गत भातोडी गावात २०० झाडांची लागवड करण्याचा निर्धार करण्यात आला. उमेद सोशल फाउंडेशनचे सल्लागार ॲड. दिपक धीवर यांनी भविष्यातील संघटनेची वाटचाल व सामाजिक कार्याची माहिती दिली. फाउंडेशनचे अध्यक्ष अनिल साळवे म्हणाले की, निसर्ग वाचवला तरच भविष्यात मानव सुरक्षित राहील. आपल्याला निसर्ग फक्त वापरण्यापुरता नाही, तर त्याचे संवर्धन करण्याचीही जबाबदारी आहे. आज आपण येथे २०० झाडे लावण्याचा संकल्प घेतला आहे. परंतु हे फक्त सुरुवात आहे.

या झाडांची निगा राखणे, त्यांना जगवणे हेच खरी जबाबदारी राहणार असल्याचे त्यांनी सांगितले. या कार्यक्रमाप्रसंगी उमेद सोशल फाउंडेशनचे सचिव सचिन साळवी, सल्लागार ॲड. दिपक धीवर, सोशल मिडियाचे विजय लोंढे, प्रकाश भालेराव, ईएचएच प्रा.लि.चे सीईओ दिपक ढवळे, सदस्य कैलास गांगर्डे, शाकिर मुलानी, जालिंदर लबडे, दिलीप अरणकल्ले, अशोक होळकर, विठ्ठल कुचे, राजेंद्र काळे, अरुण घोलप, संतोष कदम, शामराव लबडे, विलास लबडे, गणपत शिंदे, घनश्याम लबडे, ॲड. दिपक कदम आदींसह मोठ्या संख्येने ग्रामस्थ उपस्थित होते. या उपक्रमासाठी उमेदचे उपाध्यक्ष कुणाल तनपुरे, खजिनदार संजय निर्मळ, जय असोसिएशनचे अध्यक्ष ॲड. महेश शिंदे व वनरक्षक विजय चेमटे यांचे मार्गदर्शन लाभले.



# जनहितासाठी पदाचा उपयोग करा– देसाई

**अहमदनगर । प्रतिनिधी**

नगर शहरातील सावेडी येथे शिवसेनेच्या पदाधिकारी मेळाव्याचे आयोजन करण्यात आले. पर्यटन मंत्री व शिवसेना संपर्क नेते शंभूराज देसाई यांच्या उपस्थितीत झालेल्या या मेळाव्यात पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी पक्षासाठी आठवड्यातून दोन दिवस देण्याचे आवाहन करण्यात आले. देसाई यांनी सांगितले की, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे कमी बोलतात पण परफेक्ट काम करतात. पक्षात शिस्तबद्ध काम सुरू असून, सक्रिय सदस्यांना संधी दिली जाणार आहे. रिक्त पदे लवकरच भरली जातील. स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये भगवा फडकवण्यासाठी सर्वांनी एकत्र यावे असे आवाहन त्यांनी केले. आमदार अमोल खताळ व विठ्ठलराव लंघे यांनी शिंदे यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या विकासकामांचे कौतुक केले. कार्यक्रमात अनेक पदाधिकाऱ्यांना नियुक्तीपत्र देण्यात आली व काही पदाधिकाऱ्यांनी शिवसेनेत प्रवेश केला. प्रारंभी छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यास अभिवादन व दीपप्रज्वलन करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक संभाजी कदम, सूत्रसंचालन राजेंद्र टाक, व आभार दिलीप सातपुते यांनी मानले. यावेळी जिल्हाप्रमुख अनिल शिंदे, बाबूशेठ टायरवाले, शहर प्रमुख सचिन जाधव, संभाजी कदम, दिलीप सातपुते, कमलाकर कोते, नितीन औताडे, नगर तालुका प्रमुख अजित दळवी, रामदास भोर, संदेश कार्ले, शरद झोडगे, डॉ. दिलीप पवार, मनोहर पोटे, नंदकुमार ताडे, सागर बेग, माजी महापौर शिला शिंदे, सुरेखा कदम, रोहिणी शेंडगे, माजी नगरसेविका अश्विनी जाधव, संपर्क प्रमुख उज्वलाताई भोपळे, शोभा अकोलकर, माजी नगरसेवक बाळासाहेब बोराटे, गणेश कवडे, संजय शेंडगे, सचिन शिंदे, आप्पा नळकांडे, संतोष ग्यानप्पा, परेश लोखंडे, दत्ता कावरे, युवा सेनेचे राज्य संघटक बाजीराव चव्हाण, प्रशांत गायकवाड, दिपक खैरे, संग्राम कोतकर, बबलू शिंदे, दशरथ शिंदे, आशुतोष डहाळे, बापूसाहेब नेटके, कैलास माने, युवा सेनेचे जिल्हा प्रमुख योगेश गलांडे, आकाश कातोरे, साईनाथ आधाट, महेश लोंढे, ओंकार शिंदे, अमोल हुंबे, सुरेखा गव्हाणे आदी उपस्थित होते.

# पर्यायी मार्ग आधी सुस्थितीत करून द्या; अभिजीत दरेकरांसह स्थानिक नागरिकांची मागणी

**अहमदनगर । प्रतिनिधी**

अहिल्यानगर महानगरपालिकेने परिजात चौकातील अंडरग्राउंड ड्रेनेजच्या कामासाठी गुलमोहोर रोड ता.८ ते १८ जून कालावधीत चक्क भर पावसाळ्याच्या दिवसात १० दिवसांसाठी बंद करण्याची घोषणा केली आहे. मुळात भर पावसाळ्यात सर्व विकासकामे बंद ठेवावीत, असा शासननिर्देश आहे. मात्र, या निर्णयावर शहरात चर्चेचे वळण लागले असून पर्यायी मार्गाअभावी नागरिक आणि वाहनधारक हैराण होण्याची शक्यता वाढली आहे. संपुर्ण शहरात वाहतुकीचा बोजवारा उडालेला असताना गुलमोहर रोडवरही वाहतुक बंदी सुरू केली असल्याने नागरिक संतापले आहे. ''पर्यायी मार्गाचा वापर करावा'' असे आवाहन मनपा जाहिरातीत करण्यात आले असले तरी, प्रत्यक्षात हे मार्ग सुस्थितीत नाहीत, अशी टीका अभिजीत अशोक दरेकर यांनी केली आहे. ''लाल रेषेने दाखवलेले मार्ग सध्या विकासकामामुळेच बंद किंवा अडथळा ग्रस्त आहेत. त्यामुळे मुख्य रस्ता बंद करायचा असेल तर प्रथम पर्यायी रस्ते सुस्थितीत करावेत,'' असे दरेकर यांनी सांगितले. ते पुढे म्हणाले, ''आज बरेच आजी–माजी लोकप्रतिनिधी व इच्छुकांनी ही माहिती शेअर केली आहे, पण सर्वांनी एकच मुद्दा मांडला आहे पर्यायी मार्ग कुठे?''

### प्रशासक यशवंत डांगे नागरिकांना देतात खोटी माहिती की करतात माजी नगरसेवकांचा प्रचार?

**गुलमोहेर रस्ता वाहतुक बंदी संदर्भात नागरिकांनी मनपा आयुक्त तथा प्रशासक डांगेंना मनपा अधिकारी इंजि.पारखे यांना पाठवा म्हणून फोन केला असता त्यांनी 'नगरसेवक बोरकर' यांना पर्यायी रस्ता दाखविण्यासाठी पाठवतो, अशी खोटी माहिती दिली. गेल्या वर्षदिड वर्षापासून राज्य शासन–ाने महानगरपालिकेवर प्रशासक नेमलेला आहे. पहिले प्रशासक डॉ. जावळे यांची लाचखोरीच्या आरोपामुळे बदली झाली. त्यांच्या जागी उडी मारून यशवंत डांगे आले. निवडणूका न झाल्याने शहरात अधिकृत नगरसेवक नाहीत. तरीही प्रशासक डांगे नागरिकांना जुन्या नगरसेवकांची नावे सांगून खोटी माहिती देत असून ही शहरातील लोकांची दिशाभूल करण्याचा प्रयत्न आहे. प्रशासक डांगे माजी नगरसेवकांचा येत्या निवडणूकीसाठी प्रचार करत आहेत का? असा प्रश्न शहरातील नागरिकांना पडला आहे.**

महानगरपालिकेच्या सूचनेनुसार ८ जून ते १८ जून दरम्यान परिजात चौक परिसरातील वाहतूक बंद राहणार आहे. शहरातील नागरिकांनी प्रशासनाकडे योग्य नियोजनाची मागणी केली असून, ''प्रथम सोयीचे मार्ग द्या, मग मुख्य मार्ग बंद करा,'' असा सूर जनतेतून उमटत आहे.




# मनपाकडून अहिल्याबाई होळकर यांचा अवमान; दोषींवर कठोर कारवाईची मागणी

**अहमदनगर । प्रतिनिधी**

महानगरपालिकेचे जेव्हापासून पासून प्रशासक नेमले गेले तेव्हापासून मनपाच्या चाललेल्या मनमानी कारभारामुळे आता अधिकाऱ्यांनी अहिल्यानगर शहराची वाट लावण्याची जणू काही स्पर्धाच लागली असल्याचे दिसते. अहमदनगर जिल्ह्याचे नाव बदलून अहिल्यानगर करावयाच्या वादविवादात चालू असतानाच मनपा आयुक्त यांनी नगर शहरातील मनपाचे नाव टाकलेल्या अहिल्यानगर नावाचे फलक मनपा वर लावले. मनपाच्या प्रत्येक वाहनावर बदलण्याचे आदेश दिले तसेच शासकीय कामकाजाला सुद्धा अहिल्याबाई होळकर यांचे नाव देऊन अहिल्यानगर हे नाव वापरण्याचे आदेश दिल्याचे समजते. आयुक्त महोदयांनी शहरात मोठ्या प्रमाणात स्वच्छतेसाठी मोहीम राबविली परंतु त्यांच्या नगर शहरात फिरणाऱ्या त्यांच्या वाहनांकडे त्यांचे लक्ष का गेले नाही? जे वापरले जाणारे घन कचऱ्याची वाहने आहेत त्यावर सरळ शब्दात अहिल्यानगरच्या जागी हेल्यानगर हे टाकून त्या गाड्या संपूर्ण नगर शहरात फिरताना दिसत आहेत. हे सरळ सरळ राजमाता अहिल्याबाईंचा अवमान झाल्याचे दिसून येते. तसेच त्या कार्यप्रणाली कोणात्याही गाड्यांवर नंबर प्लेट नाही व मोठ्या प्रमाणात वाहनचालकाकडे लायसन्स सुद्धा नाही तरी याची सखोल चौकशी करून दोषींवर




कठोर कारवाई व्हावी, अशी मागणी करण्यात आली आहे. शहर विकास दक्षता मंचाचे अध्यक्ष विजय घासे म्हणाले की, ''नगर शहरातील प्रशासकीय पातळीवरून चालणाऱ्या निष्काळजी व अपमानकारक कृतीमुळे अहिल्याबाई होळकर यांच्या नावाचा अवमान होत आहे. आमची मागणी हीच आहे की, दोषींवर कठोर कारवाई करावी आणि नगर शहराचा व अहिल्याबाईंचा सन्मान राखावा अशी नगर शहर दक्षता विकास मंच यांच्यावतीने मागणी करण्यात आली आहे.

रयत समाचार Classified छोटी जाहिरात

छोटी जाहिरात, उत्तम प्रतिसाद

खरेदी विक्री । नोकरी विषयक । नावात बदल
आरोग्य विषयक । वाढदिवस । विवाह विषयक

**भाड्याने देणे**
परिचय हॉटेलजवळ, बालिकाश्रम रोडवर कॉर्पोरेट ऑफिस, बँक, शोरूम, क्लिनिक आदींसाठी ८०० स्क्वेअर फुटाचे दोन मजले बांधलेली जागा भाड्याने देणे आहे.
– संपर्क –
८८८८३४७४११

निसार Art
सर्व प्रकारच्या व्यावसायिक क्षेत्रातील वॉल पेन्टीग जाहिरात (भिंत पेंटिंग) साठी राज्यातील नावाजलेले निसार आर्ट
7020356335 | 9860830016
पत्ता : प्लॉट नं.३, नवीन महानगरपालिकेसमोर, औरंगाबाद रोड, अ.नगर.



मे. रुपाली एजन्सी
फुड प्रॉडक्ट मटेरियल सप्लायर्स
राधिका लॉजजवळ, तापकीर लेन, आडत बाजार, अहमदनगर – ४१४००१.
(०२४१) २३४३०६०, ९८२२८४३०६०
ई-मेल – rupaliagency@gmail.com

रावसाहेबचा चहा, एकदा पिऊन पहा!
कोतवाली पोलीसस्टेशन शेजारील सुप्रसिध्द
जगदंबा टी सेंटर
चहा, कॉफी, लेमन टी
शाखा नं.१– माणिक चौक, अ.नगर
शाखा नं.२– वसंत टॉकीजजवळ, भोला पान सेन्टर शेजारी, अ.नगर
प्रो.प्रा. रावसाहेब ठोंबे
97655 58585

सर्व प्रकारच्या छोट्या जाहीरातींसाठी ८८०५४०१८०० | ७७७४००१८०० | ९८२२४९६६६४ या क्रमांकावर संपर्क करा

हे दैनिक प्रकाशक, मालक, संपादक, भैरवनाथ तुकाराम वाकळे, 8805401800 यांनी मुद्रक आबीदखान दुलेखान यांच्या मखदुम प्रिंटर्स,३५८८, माणिक चौक, अहमदनगर येथे छापून तेथेच प्रसिध्द केले. कार्यालयाचा पत्ता : ५, गजानन अपार्टमेंट, झोपडी कॅन्टीन, मनमाडरोड, सावेडी, अहमदनगर–०३.कार्यालय, 8805401800 **Email : rayatsamachar007@gmail.com , उपसंपादक : दिपक शिरसाठ,** 7774001800, **समूह संपादक : प्रभाकर ढगे, पणजी, गोवा,** 9373021584, **गोवा कार्यालय : १३१, गोमंतक प्रेस जवळ, सांतिनेज, पणजी – गोवा, कर्नाटक कार्यालय : श्रीकांत काकतीकर, निवासी संपादक,१९१, बॅ.नाथ पै चौक, पोस्ट ऑफीसच्या मागे, शहापूर, बेळगाव कर्नाटक,** 9036799516,shrikantkaktikar@gmail.com (वाद–विवाद अहमदनगर न्यायालयीन न्यायकक्षेत)



# पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी समाजहितासाठी दक्ष राहून काम करावे- विवेक कोल्हे

## सुनील कदम यांची तालुकाध्यक्षपदी नियुक्ती | राघवेश्वर मंदिरात भव्य नागरी सत्कार

**कोपरगाव । प्रतिनिधी**

भारतीय जनता पक्षाच्या कोपरगाव तालुकाध्यक्ष (पश्चिम मंडळ) पदावर सुनील कदम यांची नुकतीच नियुक्ती करण्यात आली. या पार्श्वभूमीवर कुंभारी येथील राघवेश्वर मंदिरात त्यांचा भव्य नागरी सत्कार सोहळा मोठ्या उत्साहात संपन्न झाला. या कार्यक्रमास सहकार महर्षी शंकरराव कोल्हे सहकारी साखर कारखान्याचे अध्यक्ष आणि युवानेते विवेक कोल्हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. कार्यक्रमात बोलताना विवेक कोल्हे म्हणाले, ''पक्षहित, समाजहित आणि जनतेच्या प्रश्नांबाबत आपली भूमिका ठाम आणि पारदर्शक राहिली पाहिजे. माजी मंत्री स्व. शंकररावजी कोल्हे यांच्या विचारधारेवर चालत अन्यायाविरोधात आवाज उठवणं हे आमचं कर्तव्य आहे. पक्षाच्या माध्यमातून लोकांना न्याय मिळवून देणे, योजनांचा लाभ पोहोचवणे आणि विकासकामे गतीने राबवणे हेच आपलं ध्येय आहे.'

युवानेत्यांनी स्पष्ट केले की, पक्ष वाढीसाठी सर्व पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी निष्ठेने आणि ताकदीने काम करणे गरजेचे आहे. ''चांगले काम करणाऱ्याला संधी आणि न्याय मिळायलाच हवा. कोल्हे कुटुंब सदैव सर्वसामान्य कार्यकर्त्यांच्या पाठीशी ठाम उभे आहे,'' असेही त्यांनी सांगितले. या सोहळ्यात सुनील कदम यांचा यथोचित सन्मान करण्यात आला. त्यांना पुष्पगुच्छ, मानचिन्ह आणि शुभेच्छा देण्यात आल्या.

कार्यक्रमात कोपरगाव आणि पंचक्रोशीतील नागरिक व कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून आपली एकजूट व निष्ठा दाखवली. कार्यक्रमाला उपस्थित मान्यवरांमध्ये ज्येष्ठ नेते शरद थोरात, कोल्हे कारखान्याचे व्हा. चेअरमन राजेंद्र कोळपे, बाजार समिती सभापती साहेबराव रोहोम, औद्योगिक वसाहत उपाध्यक्ष केशव भवर, माजी पं.स. सभापती मच्छिंद्र केकाण, विलास वाबळे, सोपान पाणगव्हाने, ज्ञानेश्वर होन, कैलास माळी, रमेश घोडेराव, संभाजी गावंड, रघुनाथ फटांगारे, फकिर बोरणारे, दीपक चौधरी, दगू चौधरी, युवा मोर्चा तालुकाध्यक्ष अमोल गवळी, बाळासाहेब पाणगव्हाने, मा.सभापती सुनील देवकर, विक्रम पाचोरे, तसेच राजेंद्र गवळी, डी.पी. मोरे, निवृत्ती बनकर, शिवाजी जाधव, संदीप देवकर, शिवाजी कदम, विजय कदम, किरण कोळपे, बापू पवार, शब्बीर पटेल, पुंजाजी राऊत यांचा समावेश होता. समारंभाने कोपरगाव तालुक्यातील भाजपा कार्यकर्त्यांमध्ये नवचैतन्य निर्माण केले असून, पक्षवाढीसाठी समर्पित नेतृत्वाची दिशा स्पष्ट केली आहे.

## शेख महंमद महाराज मंदिर जिर्णोध्दार अडथळा

# १४ जुलैपासून तीव्र आंदोलन करण्याचा शेलार यांचा इशारा



**श्रीगोंदा । माधव बनसुडे**

संत शेख महंमद महाराज यांच्या मंदिराच्या जिर्णोध्दारासाठी असणारा अडथळा दुर न झाल्यास १४ जुलै २०२५पासून तीव्र आंदोलन करण्यात येणार असल्याचे यात्रा कमिटी अध्यक्ष गोपाळ पाटील मोटे पालखी सोहळा समितीचे घनःश्यम अण्णा शेलार व बाबासाहेब भोस यांनी आयोजित पत्रकार परिषदेत सांगितले . शेख महंमद महाराज मंदिर जिर्णोध्दारात अडथळा असणाऱ्या धर्मादाय आयुक्त यांच्याकडील शेख महंमद बाबा दर्गाह ट्रस्ट व वक्फ बोर्डातील रजिस्ट्रेशन रद्द होत नाही.

तोपर्यंत मंदिर जिर्णोध्दार करता येत नाही म्हणून १७ एप्रिल २०२५ ते २७ एप्रिल २०२५ पर्यंत यात्रा उत्सव समिती, गावकरी व वारकरी संप्रदायाच्या वतीने तहसील कार्यालयापुढे धरणे आंदोलन करण्यात आले मात्र त्यात प्रशासनाचा कोणताच प्रतिसाद न मिळाल्याने २८ एप्रिल रोजी आत्मक्लेष आंदोलन सुरू केले यावेळी माजी मंत्री बबनराव पाचपुते यांनी मध्यस्थी करून एक महिन्यात २८ मे २०२५ पर्यंत मुख्यमंत्री यांची बैठक घेऊन तोडगा काढू असे आश्वासन दिल्याने गावकऱ्यांच्या अनुमतीने आंदोलन स्थगित करण्यात आले होते मात्र अद्याप पर्यंत कुठलीही मुख्यमंत्र्यांची बैठक अथवा तोडगा निघाला नसल्याने गावकरी व वारकरी संप्रदाय आंदोलनातच्या पावित्र्यात आहे मात्र सध्या आषाढी एकादशी निमित्त विविध ठिकाणचे पालखी सोहळे पंढरपुरकडे निघाले असल्याने पालखी सोहळे परत येईपर्यंत जीर्णोध्दरतील अडथळे दूर न झाल्यास १४ जुलै २०२५ पासुन वारकरी संप्रदायाच्या मार्गदर्शनाखाली गावकरी, वारकरी व यात्रा उत्सव समिती पालखी सोहळा समितीचे वतीने तीव्र स्वरूपाचे आंदोलन करण्यात येईल. असा निर्णय कार्यकर्ता बैठकीत घेण्यात आला. अंदोलनात महाराष्ट्र राज्यातील सर्व वारकरी संप्रदाय सहभागी होणार असुन वारकरी संप्रदाय टोकाची भूमिका घेतल्याशिवाय राहणार नाही. वारकरी संप्रदायाशी चर्चा करुन आंदोलनाचे ठिकाण व आंदोलनाची दिशा ठरविण्यात येईल अशी माहिती घनःश्याम शेलार यांनी पत्रकार परिषदेत दिली. यावेळी बाबासाहेब भोस ,घनश्याम अण्णा शेलार, गोपाळ मोटे, एकनाथ आळेकर, नाना कोथिंबीरे, सुनील वाळके यांच्यासह यात्रा उत्सव समिती सदस्य पालखी सोहळा समिती सदस्य कार्यकर्ते उपस्थित होते.



# शिवसेना डॉक्टर सेल आयुष होमिओपॅथिक विंग उत्तर महाराष्ट्रप्रदेश प्रमुखपदी डॉ.दिलीप पवार


**नगरतालुका । प्रतिनिधी**

तालुक्यातील वैद्यकीय, शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रात कार्यरत असलेले पंचायत समितीचे माजी उपसभापती डॉ. दिलीप दत्तात्रय पवार यांची शिवसेना डॉक्टर सेल आयुष होमिओपॅथिक विंगचे उत्तर महाराष्ट्र प्रदेश प्रमुख तसेच महाराष्ट्र राज्य विस्तारक म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. ही नियुक्ती राज्याचे उपमुख्यमंत्री व माजी मुख्यमंत्री नामदार एकनाथ शिंदे तसेच खासदार डॉ. श्रीकांत शिंदे (एम. एस. ऑर्थो) यांच्या आदेशाने व शिवसेना डॉक्टर सेल प्रदेश प्रमुख डॉ. धनंजय पडवळ तसेच आयुष होमिओपॅथिक विंगचे प्रदेशप्रमुख डॉ. करणसिंह गाडे यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आली. यावेळी महाराष्ट्र राज्याचे पर्यटन विकास मंत्री व अहिल्यानगरचे संपर्कमंत्री शंभुराजे देसाई, आमदार विठ्ठलराव लंघे, आणि आमदार अमोल खताळ यांच्या हस्ते डॉ. पवार यांना नियुक्ती पत्र देण्यात आले. या कार्यक्रमास शिवसेनेचे अहिल्यानगर जिल्हाप्रमुख अनिल शिंदे, जिल्हाप्रमुख बाबूशेठ टायरवाले, डॉक्टर सेलचे जिल्हा संघटक डॉ. सचिन गोरे, नगर तालुका माजी सभापती रामदास भोर, माजी जिल्हा परिषद सदस्य संदेश कार्ले, शरद झोडगे, प्रकाश कुलट, उद्योजक गणेश लंघे, संभाजी कदम, माजी नगरसेवक बाळासाहेब बोराटे आदी उपस्थित होते.

# सुफी-संतांच्या पावनभूमीत जात, धर्म व पंथाचा भेदभाव नाही, माणुसकी हाच धर्म- डोंगरे

## निमगाव वाघात बकरी ईदला धार्मिक ऐक्याचे दर्शन

**नगरतालुका । प्रतिनिधी**



निमगाव वाघा येथे बकरी ईद (ईद उल अजहा) उत्साहात साजरी करण्यात आली. ईद निमित्त हिंदू बांधवांनी गावातील मुस्लिम समाजाला शुभेच्छा देऊन धार्मिक ऐक्याचे दर्शन घडविले. गावात सकाळी मुस्लिम बांधवांनी ईदची नमाज पठण करुन गावाच्या सुख, शांती व समृध्दीसाठी प्रार्थना केली. श्री नवनाथ युवा मंडळ, स्व.पै. किसनराव डोंगरे बहुद्देशीय संस्था, एकता फाऊंडेशन व धर्मवीर ग्रामीण सार्वजनिक वाचनालयाच्या वतीने मुस्लिम बांधवांना ईदच्या शुभेच्छा देण्यात आल्या. यावेळी डोंगरे संस्थेचे अध्यक्ष तथा ग्रामपंचायत सदस्य पै. नाना डोंगरे, एकता फाऊंडेशनचे अध्यक्ष अतुल फलके, मुख्याध्यापक आदम शेख, प्राथमिक शिक्षक हुसेन शेख, रऊफ शेख, साहिल शेख, उद्योजक दिलावर शेख, मुराद शेख, सचिन जाधव, हारुन शेख, युवा मंडळाचे अध्यक्ष संदिप डोंगरे, मोईन शेख, अनिस शेख, अरबाज शेख, साद शेख आदींसह ग्रामस्थ उपस्थित होते. सकाळी ९ वाजता गावात ईदची नमाज मौलाना इलियास यांच्या मार्गदर्शनाखाली पठण करण्यात आली. पै.नाना डोंगरे म्हणाले की, पुरोगामी महाराष्ट्रात सर्व धर्मिय गुण्यागोविंदाने नादतात, ही आपल्या भारतीय संस्कृतीची ओळख आहे. सर्व हिंदू-मुस्लिम समाज बांधव एकमेकांच्या सण-उत्सवात सहभागी होत असतात. सुफी-संतांच्या पावन भूमीत जात, धर्म व पंथाचा भेदभाव होत नाही. माणुसकी हाच खरा धर्म असल्याचे त्यांनी सांगितले.

# श्रीरामपुरला ईद-उल-अज्हा उत्साहात

## बेलापूर, पढेगाव, टिळकनगर, खिर्डी सर्वत्र ईद साजरी

**श्रीरामपूर । शफीक बागवान**

ईद-उल-अज्हा अर्थात बकरी ईद चा सण श्रीरामपूर शहरासह तालुक्यातही मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. इस्लामी कालगणनेतील उर्दू महिना जिलहिज्जा च्या दहा तारखेला बकरी ईद साजरी केली जाते. राज्यस्तरीय चांद समितीने बकरी ईद शनिवारी साजरी केली जाणार असल्याचे स्पष्ट केल्यानंतर ता.७ सकाळी सामुदायिकरीत्या मुस्लीम बांधवांनी पारंपरिक पध्दतीने नमाज पठण केली.

श्रीरामपूर शहर आणि तालुक्यातील वेगवेगळ्या मशिदीतून ही वेळ निश्चित करण्यात आली होती.

रहेमत ए आलम येथे मौलाना ईमदादअली रिजवी कादरी यांनी सारथ्य केले. हाफीज जहुर अली यांनी गरीब नवाज येथे नमाज पठन केले. शहरातील ईदगाह मैदानावर अकबर अली काझी यांनी नमाज पठण केले. माजी उपनगराध्यक्ष मुजफ्फर शेख, अशपाक भाई शेख यांनी नमाज साठी आलेल्या सर्व त्या बांधवांचे सहर्ष स्वागत केले.



आमदार हेमंत उगले करण ससाने सचिन गुजर आदींनी तेथे मुस्लिम बांधवांना शुभेच्छा व्यक्त केल्या. तसेच शहरातील जामा मशीद येथेही या सर्वांनी उपस्थित राहत मुस्लिम बांधवांना एक निमित्ताने शुभेच्छा व्यक्त केल्या.

जामा मशिदीचे विश्वस्त जेष्ठ नगरसेवक हाजी अंजूम शेख, पत्रकार हाजी शफीक बागवान, हाजी तनवीर रजा, माजी नगरसेवक नजीरभाई मुलानी, मुन्ना पठाण, नगरसेवक हाजी मुजफ्फर शेख, हाजी रफीकभाई बागवान, हाजी मुख्तार शाह, अश्फाक शेख, दिनमहम्मद शेख, मजीद खान पठाण, डॉ. तोफीक शेख इमरान पोपटिया, यांनी ही ईद निमित्ताने शुभेच्छा व्यक्त केल्या. शासकीय आदेशासह धार्मिक शास्त्रीय नियमांचे (शरियत) काटेकोरपणे पालन करत धनिक मुस्लिमांनी कुर्बानी करण्यात आली दरम्यान, शहरातील रहेमत-ए- आलम या वातानुकूलित मशिदीबरोबरच जामा मशीद हजरत ख्वाजा गरीब नवाज, कुरेशी मोहल्यातील मक्का मशिद, तसेच इतर ठिकाणीही नमाज पठन करण्यात आले. याशिवाय तालुक्यातील बेलापुर, पढेगाव, टाकळीभान, टिळकनगर, गोंधवणी, खिर्डी, अशा अनेक गावामध्ये नमाजचे आयोजन करण्यात आले होते.तालुक्यातील बेलापुर येथे ईदगाह मैदानावर जामा मशिदीचे मौलाना मोहम्मद फैजान यांनी नमाजचे रद्द केले. या ठिकाणी ावातील सर्वच प्रमुख पुढाऱ्यांसह जामा मशिदीचे प्रमुख विश्वस्त जाफरभाई आतार, मोहसीन सय्यद, फिरोज दारूवाले, अकबरभाई बागवान, शफीक आतार आदींनी मुस्लिम बांधवांचे स्वागत केले.

# मकरंद अनासपुरे यांचे सहकुटूंब शनीदर्शन

**नेवासा । विजय खंडागळे**



मराठी चित्रपटसृष्टीतील प्रसिद्ध अभिनेता मकरंद अनासपुरे यांनी काल आपल्या कुटुंबीयांसह शनिशिंगणापूर येथे शनीदर्शन घेऊन मन प्रसन्न केले. काल दुपारी अनासपुरे कुटुंब शनिशिंगणापूर येथे आले. पुराशी महाराज मठामध्ये तेल अभिषेक करून त्यांनी शनिचौथऱ्यावर जाऊन शनी देवाचे दर्शन घेतले. यावेळी त्यांची पत्नी व कुटुंबातील इतर सदस्यही उपस्थित होते.

दर्शनादरम्यान परिसरात चाहत्यांनी मोठी गर्दी केली होती. अनेकांनी सेल्फी घेण्यासाठी एकच झुंबड उडवली. त्यांच्याशी संवाद साधताना मकरंद अनासपुरे यांनी आपल्या खास शैलीत मनमोकळ्या गप्पा मारल्या. देवस्थान समितीच्या वतीने आणि पोलीस पाटील संघटनेचे राज्य सदस्य ॲड. सयाराम बानकर यांच्या हस्ते अनासपुरे कुटुंबाचा सन्मान करण्यात आला. मकरंद अनासपुरे हे राज्यपाल पुरस्कार प्राप्त कलावंत असल्यामुळेही उपस्थितांनी त्यांचे विशेष स्वागत केले. यावेळी बोलताना अनासपुरे म्हणाले, ''ग्रामीण मराठी चित्रपट सृष्टीत दादा कोंडके यांनी विनोदी अभिनयाच्या माध्यमातून मायमराठीचे जतन केले. त्यांच्या कार्यामुळेच ग्रामीण भागातील चित्रपटसृष्टी टिकून राहिली. आजही त्यांची आठवण होत असते.'' ते पुढे म्हणाले, ''धार्मिक स्थळांवरील लोकांचा विश्वास अद्यापही दृढ आहे. शनिशिंगणापूर हे त्याचे उत्तम उदाहरण आहे. आजच्या सुट्टीच्या दिवशी दोन लाखांहून अधिक भाविक दर्शनासाठी आले आहेत. पावसाची रिपरिप सुरू असूनही लोकांच्या श्रद्धेला बाधा आली नाही.''

# जननायक बिरसा मुंडा

आज ९ जून, भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील आदिवासी जननायक बिरसा मुंडा यांचा स्मृतिदिन. जननायक बिरसा मुंडा यांचा जन्म १५ नोव्हेंबर १८७५ रोजी रांची जवळील लिहती या खेडेगावात झाला. त्यांच्या वडिलांचे नाव सुगमा मुंडा तर आईचे नाव करमी हातू असे होते. त्यांचे वडील शेतमजूर होते. घरची परिस्थिती गरिबीची असूनही त्यांना इंग्रजी माध्यमाच्या चाईबासा इंग्लिश मिशनिरी स्कुलमध्ये शिक्षणाची संधी मिळाली. इंग्रजी शिक्षणामुळे त्यांच्यावर आधुनिक विचारांचा प्रभाव पडला. बिरसा मुंडा हे जरी इंग्रजी शाळेत शिकत असले तरी त्यांना भारतीय संस्कृतीचा अभिमान होता. १८७८ – ७९ मध्ये ब्रिटिशांनी वन कायद्यात बदल केला. या नव्या कायद्यानुसार आदिवासींच्या ताब्यात असलेल्या जंगलांवर ब्रिटिशांची मालकी झाली. या कायद्यामुळे आदिवासींवर बेघर होण्याची वेळ आली. आदिवासींनी उदरनिर्वाहासाठी फळे, कंदमुळे, लाकुडफाटे अथवा जनावरांसाठी चारा तोडल्यास त्यांना शिक्षा होऊ लागली आणि आदिवासींच्या आस्तित्वाचाच प्रश्न निर्माण झाला. या कायद्या विरोधात आदिवासींनी न्यायालयात दाद मागितली पण तिथेही त्यांना न्याय मिळाला नाही. १८८४ साली बिहारमध्ये भीषण दुष्काळ पडला. भीषण दुष्काळ आणि उपासमारीने अनेक लोक मरण पावली. जननायक बिरसा मुंडा यांनी या काळात आदिवासी समाजाची निःस्वार्थ सेवा केली. भीषण दुष्काळात लोक उपासमारीने मरत असताना लोकांप्रति संवेदना व्यक्त करण्याऐवजी जुलमी ब्रिटिश सरकारने अवाजवी शेतसारा आकारला. ब्रिटिशांनी आकारलेल्या अवाजवी शेतसाऱ्याला जमीनदार आणि जहागिरदारांनी पाठिंबा दिला त्यामुळे चिडलेल्या बिरसा मुंडा यांनी जनआंदोलन उभारले. हे जनआंदोलन जहागीरदार व जमीनदारांच्या शोषणाविरुद्ध होते. आदिवासी बांधव मोठ्या संख्येने या जनआंदोलनात सहभागी होऊ लागल्याने हे आंदोलन दडपण्यासाठी जहागीरदार आणि जमीनदारांच्या माध्यमातून ब्रिटिशांनी बिरसा मुंडा यांना रोखण्याचा प्रयत्न केला. १८८५ साली बिरसा मुंडा यांना दोन वर्ष कारावासाची शिक्षा सुनावण्यात आली. त्यांना हजारीबागच्या तुरुंगात पाठवण्यात आले. तुरुंगात असतानाच त्यांनी जुलमी ब्रिटिश सरकार उखडून टाकण्याचा संकल्प केला. दोन वर्षांची शिक्षा भोगून आल्यावर त्यांनी आदिवासी समाजाला संघटित करून ब्रिटिश सरकार विरुद्ध लढा पुकारला. १८८७ मध्ये बिरसा मुंडा यांच्या नेतृत्वाखाली आदिवासी समाजाने ब्रिटिशांविरुद्ध अनेक लढाया करून त्यांना जेरीस आणले. या लढाया त्यांनी पारंपरिक शस्त्रांनी म्हणजे भाले, तलवारी, धनुष्यबाण यांच्या साहाय्याने लढल्या. आदिवासी, दुर्गम, डोंगराळ भागातून पारंपरिक पद्धतीने लढा उभारून त्यांनी ब्रिटिशांना सळो की पळो करून सोडले. बिरसा मुंडा यांच्या नेतृत्वाखालील आदिवासी समाज आपल्याला दाद देत नाही हे लक्षात आल्यावर ब्रिटिशांनी अतिरीक्त ८ कुमुक मागवली आणि आदिवासींवर हल्ला केला त्यात ४०० आदिवासी बांधव शहीद झाले. तरीही बिरसा मुंडा यांनी हार मानली नाही त्यांनी आपली लढाई चालूच ठेवली. १८९० मध्ये बिरसा मुंडा डोमवाडी पहाडात आदिवासी बांधवांना मार्गदर्शन करत असताना ब्रिटिश सैन्याने त्यांच्यावर हल्ला केला. भीषण लढाई झाली. बिरसा मुंडा यांना अटक करून रांचीच्या कारागृहात त्यांची रवानगी करण्यात आली. २० मे १९०० रोजी त्यांना एकांत कोठडीत ठेवण्यात आले. एकांत कोठडीत जेवण करण्यास त्यांनी नकार दिला त्यामुळे त्यांना अशक्तपणा आला. न्यायालयातच ते बेशुद्ध पडले. त्यांना न्यायालयातून कारागृहात आणण्यात आले औषध उपचार करण्यात आले त्यांची तब्येत सुधारली मात्र ९ जून १९०० रोजी त्यांना रक्ताची उलटी झाली ते बेशुद्ध पडले व त्यातच त्यांची प्राणज्योत माळवली. त्यांचा मृत्यू एशियाटिक कॉलरा या आजाराने झाला असे सरकारच्या वतीने सांगण्यात आले असले तरी त्या आजाराची कोणतेही लक्षणे त्यांच्या शरीरावर दिसत नव्हते त्यामुळेच इतिहासकार ब्रिटिशांनी त्यांची हत्या केली असा संशय व्यक्त करतात. नेपोलियनला जसे आर्सेनिक देऊन ठार मारले तेच लक्षणे बिरसा मुंडा यांच्या शरीरावर दिसत होते शिवाय त्यांना कारागृहातच दफन करून पुरावा नष्ट करण्यात आला. भारतीय स्वातंत्र्य लढ्यात जननायक बिरसा मुंडा यांचे योगदान अतुलनीय असे आहे. आदिवासींच्या न्याय हक्कासाठी मोठा लढा उभारून त्यांनी जे महान कार्य केले त्याला तोड नाही त्यामुळेच त्यांना आदिवासी जननायक हा किताब जनतेने बहाल केला. आदिवासी जननायक बिरसा मुंडा यांना स्मृतिदिनी विनम्र अभिवादन!





श्याम बसप्पा ठाणेदार
दौंड, जिल्हा पुणे
९९२२५४६२९५

समाजसंवाद

भा.पा. हिवाळे शिक्षण संस्थेचे
ग्रामीण विकास व अध्ययन केंद्र,
समाजकार्य व संशोधन संस्था, अहिल्यानगर
NAAC ACCREDITED A Grade

शैक्षणिक वर्ष २०२५-२६ साठी प्रवेश सुरु
माध्यम क्षेत्रात करिअर करण्याची सुवर्ण संधी

बॅचलर इन जर्नालिझम अँड मास कम्युनिकेशन (B.Voc JMC)

- अभ्यासक्रम कालावधी: 03 वर्षे (१ ले वर्ष - सर्टिफिकेट, २ रे वर्ष - डिप्लोमा, तिसरे वर्षे - पदवी)
- पात्रता: 12वी उत्तीर्ण किंवा कोणत्याही शाखेचा डिप्लोमा
- प्रवेश क्षमता: ५०






- यूजीसी प्रायोजित अभ्यासक्रम
- सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्न
- माध्यम क्षेत्रातील नामांकित शैक्षणिक संस्था
- तज्ञ व अनुभवी प्राध्यापक
- सुसज्ज मीडिया सेंटर
- 60% प्रॅक्टिकल, 40% थेअरी
- नामांकित प्रिंट व इलेक्ट्रॉनिक माध्यम समूहाशी करार

मिडीयामधील करिअरच्या संधी
कंटेंट रायटर, न्यूज अँकर, ग्राफिक डिझायनर, व्हिडिओ एडिटिंग, मार्केटिंग, जाहिरात, रेडिओ जॉकी, जनसंपर्क, डिजिटल मार्केटिंग

प्रवेशासाठी संपर्क
सीएसआरडी कॅम्पस, अहमदनगर महाविद्यालया समोर, स्टेशन रोड, अहिल्यानगर - ४१४००१

0241-2346328 csrd.iswr@gmail.com www.csrd.edu.in

# विठ्ठलराव वाडगे हे खऱ्या अर्थाने सहकारमहर्षी- डॉ.सागर आटोळे

## वृध्देश्वर सोसायटी वर्धापनदिनी महिला बचतगटाला कर्जवाटप

**श्रीगोंदा । माधव बनसुडे**

१२ वर्षापूर्वी संस्थापक चेअरमन विठ्ठलराव वाडगे यांनी वृद्धेश्वर अर्बन मल्टीस्टेट को ऑपरेटिव्ह सोसायटीचे रोपटे लावले गेल्या १२ वर्षात २८५ कोटी रुपयांच्या ठेवी मिळवणे, महिला बचत गटातील महिलांना २२ कोटींचे कर्ज वाटप करणे ,शेतकऱ्यांना बियाणापासून कृषी मालाला अधिक दर मिळण्यासाठी चैतन्य कृषी उत्पन्न बाजार समिती उभारणे हि सर्व कामे करणारे विठ्ठलराव वाडगे हे खऱ्या अर्थाने सहकार महर्षी असल्याचे गौरवोद्गार बारामती येथील ज्ञानसागर गुरुकुल शिक्षण संस्थेचे अध्यक्ष डॉ. सागर आटोळे यांनी श्रीगोंदा येथे बोलताना काढले. वृध्देश्वर अर्बन मल्टीस्टेट को ऑपरेटिव्ह सोसायटी श्रीगोंदा च्या १२ व्या वर्धापन दिना निमित्त आयोजित महिला मेळावा आणि विद्यार्थी करियर कार्यक्रमा त अध्यक्षपदावरून आटोळे बोलत होते. ते पुढे म्हणाले सामाजिक बांधिलकी आणि सामान्य लोकांच्या उन्नतीचा उदात्त हेतू असला की हे घडते यासाठी चिकाटी,हेतू शुद्ध असावा लागतो या यशामध्ये ग्राहक,सभासद,कर्मचारी यांचाही वाटा असल्याचे वाडगे यांनी कर्मचाऱ्यांचा सन्मान करून दाखवले. आता कर्ज घेतलेल्या महिलांनी उद्योग छोटा का असेना पण त्यात पैसे गुंतवून स्वतःचा आर्थिक उत्कर्ष करावा तसेच वृद्धेश्वर अर्बन मल्टीस्टेट सोसायटी चा देखील लौकिक वाढवावा असे आवाहन करून भविष्यात आपण देखील वृद्धेश्वर अर्बन मल्टीस्टेट सोसायटी साठी ठेवी देऊ. प्रसिद्ध व्याख्यात्या विजया वामन यांनी महिलांना मार्गदर्शन करताना महिलांनी संसार गाडा चालवताना स्वतः च्या उत्कर्षाचा विसर पडू देऊ नये विठ्ठलराव वाडगे यांच्यासारखी माणसे महिला सक्षमीकरणासाठी झटत आहेत त्यांना प्रतिसाद देऊन आपण यशस्वी होऊ याची खुणगाठ बांधून संसाराला आर्थिक मदत होण्यासाठी कष्ट करा,आपल्या लेकी, सुना यांना प्रोत्साहन द्या असे आवाहन करून वाडगे यांची पत्नी रुक्मिणी वाडगे,स्नुषा सायली वाडगे ,मुलगी मेघना गावडे या देखील महिला सक्षमीकरण मध्ये नवनविन योजना महिलांसाठी राबवत आहेत याचे कौतुक केले. कृषी उद्योजक पवन थोरात यांनी कृषी बाबत वाडगे यांनी राबविलेले उपक्रम जिल्ह्यात आदर्श ठरत असून ऑनलाईन कृषी मार्गदर्शन उपक्रमात सहभागी होण्याचे आवाहन केले. वृध्देश्वर अर्बन मल्टीस्टेट सोसायटी चेअरमन सौ.सायली वाडगे यांनी बोलताना १२ वर्षाच्या वाटचाली मध्ये बचत गटातील महिलांनी वेळेवर कर्ज परत केल्याने वर्धापन दिना निमित्त प्रति महिला १लाख रुपये तसेच,प्रति महिला ९०हजार रुपये,प्रति महिला ७० हजार रुपये असे २२ लाखाचे कर्ज वाटप केल्याचे सांगितले. यावेळी,देवी महिला बचत गट औटेवाडी ३ लाख रुपये,राधाकृष्ण महिला बचत गट, मढेवडगाव २लाख ४० हजार,दत्त महिला बचत गट घारगाव २लाख १० हजार रुपये कर्ज वाटप विजया वामन,सागर आटोळे ,आदींच्या हस्ते देण्यात आले. व्यवस्थापक प्रदीप आठरे यांनी कर्मचारी वृंद तर्फे मनोगत व्यक्त करताना शिक्षक होण्याचे स्वप्न धूसर होताना विठ्ठलराव वाडगे यांनी नोकरीची संधी दिली सुमारे १०० कर्मचारी सेवेत असून प्रत्येकाच्या अडचणीत वाडगे कुटुंब उभे राहत असून मालक सेवक नाते नसून परिवार समजत असल्याने सोसायटी प्रगती करत आहे.

## ‘गरुड फाउंडेशन’च्या वतीने

# आप्पासाहेब ढोकणे यांना समाजभूषण पुरस्कार जाहीर

**राहुरी । प्रतिनिधी**

प्रहार दिव्यांग संघटनेचे जिल्हासमन्वयक आप्पासाहेब ढोकणे यांनी निवेदकीय व दिव्यांग क्षेत्रामध्ये उल्लेखनीय काम केल्याबद्दल गरुड फाउंडेशन च्या वतीने २०२५ चा राज्यस्तरीय समाजभूषण पुरस्कार जाहीर झाला. हा पुरस्कार ७ जून २०२५ अण्णासाहेब शिंदे सभागृह महात्मा फुले कृषी विद्यापीठ राहुरी या ठिकाणी सन्मानपूर्वक प्रदान करण्यात येणार आहे. अहिल्यानगर जिल्यातची बुलंद तोफ कोणत्याही कार्यक्रमात सूत्रसंचालन करून आपली वेगळी ओळख निर्माण करणारे तसेच दिव्यांग बांधवांना ही न्याय देणारे त्यांचे प्रश्न सोडवणारे म्हणजे आप्पासाहेब ढोकणे यांना पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल जिल्हा उत्तर अहिल्यानगर जिल्हाध्यक्ष मधुकर घाडगे जिल्हा सल्लागार सलीमभाई शेख तालुकाध्यक्ष योगेश लबडे महिला तालुकाध्यक्ष सौ.छायाताई हारदे तालुका सचिव दत्तात्रय खेमनर तालुका उपाध्यक्ष माणिक तारडे तालुका समन्वयक तुकाराम बाचकर, तालुका सल्लागार बाबुराव शिंदे सर तालुका संपर्कप्रमुख रवींद्र भुजाडी कोंडवड शाखा अध्यक्ष विजय म्हसे माहेगाव शाखाध्यक्ष भरत आढाव,दवणगाव शाखाध्यक्ष नानासाहेब खपके मानोरी शाखाध्यक्ष सुभाष कोकाटे सर तालुका पदाधिकाऱ्यांनी अभिनंदन केले. पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देण्यात आले.




# ‘वैज्ञानिक भौतिकवाद’ ग्रंथाचा मराठी अनुवाद प्रकाशनाच्या वाटेवर

## गाथा कॉग्निशनकडून २० जून रोजी ग्रंथ वितरण

**पुणे । प्रतिनिधी**

‘वैज्ञानिक शोध’ आणि ‘भौतिकवादी दृष्टीकोन’ यांचा सुसंवादी मेळ घालणारा महत्त्वपूर्ण ग्रंथ ‘‘वैज्ञानिक भौतिकवाद‘‘ आता मराठीतून वाचकांच्या भेटीला येत आहे. महापंडित राहुल सांकृत्यायन यांच्या मूळ लेखनाचा डॉ. विजय भगत यांनी मराठी अनुवाद केला असून, तो गाथा कॉग्निशन या प्रकाशनसंस्थेमार्फत २० जून २०२५ रोजी प्रसिद्ध होणार आहे. या ग्रंथात सांकृत्यायन यांनी वैज्ञानिक तत्त्वज्ञानाच्या मागच्या भौतिकवादी दृष्टिकोनाची तात्विक मांडणी करताना, निरीक्षणे, शास्त्रीय नोंदी आणि प्रामाणिक संशोधनांचा आधार घेतलेला आहे. ‘वैज्ञानिक भौतिकवाद’ हे केवळ तत्त्वज्ञान नव्हे, तर एक दृष्टिकोन आणि जीवनदृष्टी आहे, असे मत तज्ज्ञांकडून व्यक्त होत आहे. संपूर्ण समाजाला वैज्ञानिक दृष्टिकोनाची गरज असलेल्या काळात हा ग्रंथ अत्यंत महत्त्वाचा ठरणार आहे. मराठीत अनुवाद होऊन तो आता अधिक व्यापक वाचकांपर्यंत पोहोचणार आहे, ही खरोखर स्वागतार्ह बाब आहे.याविषयी अधिक माहिती देताना किशोर मांदळे यांनी सांगितले की, हे पुस्तक वाचणेच आहे. आजच्या आपल्या लौकिक उर्फ भौतिक जगण्यातील सर्व आधुनिक सज्जता विज्ञानानेच आपल्याला दिली आहे. त्याचे लाभ घेताना आपल्याला त्यामागील वैज्ञानिक मूलतत्त्वे, समीकरणे माहित असण्याची बिलकूल गरज पडत नाही. त्यामुळे वैज्ञानिक दृष्टीकोन नसल्याने आपले काहीच अडत नाही, अशी आपली समजूत झाली आहे. पण, आपण काही स्वर्ग, ब्रह्मांड असल्या कल्पनेतील पारलौकिक विश्वात जगत नसतो. आपले रोजचे जगणे हे वास्तवाच्या जमिनीवरचे म्हणजेच भौतिक आहे. म्हणून




रोजच्या जगण्यातील पेच, समस्या, गुंते देखिल अटळपणे भौतिकच आहेत. ते सोडविण्यासाठी आपल्याला विचार करण्याची भौतिकवादी पद्धतच उपयुक्त ठरणार आहे. तथापि, ही विचार करण्याची भौतिकवादी पद्धत आहे तरी काय ? याच प्रश्नाचे विस्तृत व शक्य तितक्या सोप्या भाषेत महापंडित राहुल सांकृत्यायन यांनी दिलेले उत्तर म्हणजे वैज्ञानिक भौतिकवाद. हा वैज्ञानिक भौतिकवादी दृष्टीकोन आपल्याला नीट समजला तर आपल्या व्यक्तिगत व सामाजिक जीवनाला योग्य दिशेने घेऊन जाण्याचा आत्मविश्वास आपल्या ठायी येईल. आठ दशकांपूर्वी राहुल सांकृत्यायन यांचा हा वैज्ञानिक भौतिकवाद पुस्तक रूपाने आला. आता तो सुबोध मराठीत आणण्याचा अक्षरांचा श्रम प्रा. डॉ. विजय भगत यांनी पूर्णत्वास नेला आहे. त्याचे फलित म्हणजे हे पुस्तक.

ग्रंथाची किंमत २७५ रुपये ठेवण्यात आली असून, प्रकाशनपूर्व सवलतीच्या दरात (२०० रुपये + ४० रुपये टपालखर्च) प्री-ऑर्डरसाठी उपलब्ध आहे. अधिक माहितीसाठी संपर्क : +९१ ९५९५६६६३६६ (डॉ. कल्पना भगत), www.gathacognition.com, office@gathacognition.com.

# रिपब्लिकन सेनेचे ज्येष्ठ नेते काकासाहेब खंबाळकर यांचा रिपब्लिकन पक्षात प्रवेश

**संगमनेर / नितीनचंद्र भालेराव**

रिपब्लिकन सेनेचे ज्येष्ठ नेते काकासाहेब खंबाळकर यांनी रिपब्लिकन सेनेचा राजीनामा देऊन रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले )पक्षात प्रवेश केला.ज्येष्ठ नेते काकासाहेब खंबाळकर यांचे रिपब्लिकन पक्षात स्वागत करण्यात आले. मुंबई मराठी पत्रकार संघात त्यांच्या पक्ष प्रवेशाची माहिती रिपब्लिकन पक्षाच्या वतीने आयोजित केलेल्या पत्रकार परिषदेत अधिकृतरित्या देण्यात आली. मुंबई मराठी पत्रकार संघात रिपब्लिकन पक्षाने आयोजित केलेल्या पत्रकार परिषदेत रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय सरचिटणीस अविनाश महातेकर,राज्य सरचिटणीस गौतम सोनावणे, मुंबई प्रदेश अध्यक्ष सिध्दार्थ कासारे,रिपब्लिकन पक्षाचे सचिव सुरेश बारशिंगे, विजय सोनवणे, प्रदेशाध्यक्ष उपाध्यक्ष श्रीकांत भालेराव, विवेक पवार, प्रकाश जाधव, सोना कांबळे आदि नेते उपस्थीत होते.



रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री ना.रामदास आठवले यांचे नेतृत्व आंबेडकरी जनतेला, सर्व बहुजन समाजाला न्याय देणारे नेतृत्व आहे. राष्ट्रीय स्तरावर खऱ्या अर्थाने दलित बहुजनांचे नेतृत्व करणारे एक आदर्श नेते म्हणुन ना.रामदास आठवले आपल्याला सदैव प्रिय आहेत. आपण ना.रामदास आठवले यांच्या पासुन मनाने कधीही दुर गेलो नाही. ना.रामदास आठवले हे कायम आमचे नेते राहिले आहेत.पक्ष भेदा पलीकडे जाऊन ते सर्व समाजमान्य नेते झाले आहेत. महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या संकल्पनेतील रिपब्लिकन पक्ष साकार करण्यासाठी रामदास आठवले कार्य करत आहेत.त्यात ते यशस्वी झाले आहेत.समाजाला सदैव न्याय देण्यासाठी ते कार्यरत असतात.मोठ्या मनाचे नेते असल्यामुळे आपण ना.रामदास आठवले यांच्या नेतृत्वात रिपब्लिकन पक्षात प्रवेश केल्यानंतर काकासाहेब खंबाळकर यांनी यावेळी आपल्या भावना व्यक्त केल्याची माहिती रिपब्लिकन पक्षाचे प्रदेशाध्यक्ष उपाध्यक्ष तथा अहिल्यानगर जिल्हा संपर्कप्रमुख श्रीकांत भालेराव यांनी दिली.